# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ

**(शासनाचा सार्वजनिक उपक्रम)**

**५८३/ब, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११ ०३७.**


## सरळसेवा पद भरती जाहिरात २०१८

## जाहिरात क्रमांक ०१/२०१८

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या आस्थापनेवरील गट 'क' मधील **कनिष्ठ साठा अधिक्षक** संवर्गातील एकूण २२ पदे, **भांडारपाल** संवर्गातील एकूण ६१ पदे व **सहायक** संवर्गातील एकूण ११ पदे सरळसेवेने भरण्याकरीता अर्हताधारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच https://maharecruitment.mahaonline.gov.in यांचे मार्फत अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| **ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात** | **ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत** |
|---|---|
| दिनांक ०९-०१-२०१८ | दिनांक ३०/०१/२०१८ |

सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहीरात www.mswarehousing.com व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहीती काळजीपुर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहित चलनाद्वारे भरलेले परिक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहिल.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच भरतीप्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांना राहतील. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

सरळसेवा भरतीबाबत कोणाच्या दबावास / प्रभावास बळी पडून फसवणूक झाल्यास महामंडळ जबाबदार राहणार नाही. फसवणूकीबाबत काही तक्रार असल्यास संबंधीतांनी पोलीस तक्रार करावी किंवा अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो यांचेकडे तक्रार करावी.

सरळसेवा भरती प्रकरणी कोणीही राजकीय किंवा अराजकीय प्रभाव / दबाव टाकण्याचा प्रयत्न करुन नये. तसे आढळून आल्यास भरती प्रक्रियेतून संबंधीत उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

**<u>संवर्ग निहाय रिक्त पदे :-</u>** रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे -

### १. कनिष्ठ साठा अधिक्षक

पे-बँड ₹५२०० — २०२०० ग्रेड पे — २४००

| जातप्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. जाती | ३ | १ | -- | -- | -- | -- | -- | २ |
| अनु. जमाती | २ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| विमुक्त जाती (अ) | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| भ ज (ब) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| भ ज (क) | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| भ ज (ड) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| विशेष मागास प्रवर्ग | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| इतर मागासवर्गीय | ४ | १ | १ | -- | -- | -- | १ | १ |
| खुला | ११ | ३ | २ | १ | १ | -- | १ | ३ |
| एकूण | २२ | ७ | ३ | १ | १ | -- | २ | ८ |

**अपंग आरक्षण: वरील पदांमध्ये १ पद <u>अस्थिव्यंग या</u> प्रवर्गासाठी राखीव आहे.**

## २. भांडारपाल

पे-बँड ₹ ५२०० — २०२०० ग्रेड पे — १९००

| जातप्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. जाती | १० | ३ | २ | १ | १ | -- | १ | २ |
| अनु. जमाती | ५ | २ | १ | -- | -- | -- | १ | १ |
| विमुक्त जाती (अ) | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| भ ज (ब) | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| भ ज (क) | ३ | १ | -- | -- | -- | -- | -- | २ |
| भ ज (ड) | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| विशेष मागास प्रवर्ग | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| इतर मागासवर्गीय | १२ | ४ | २ | १ | १ | -- | १ | ३ |
| खुला | २८ | ८ | ४ | १ | १ | १ | ३ | १० |
| एकूण | ६१ | १८ | ९ | ३ | ३ | १ | ६ | २१ |

**अपंग आरक्षण: वरील पदांमध्ये २ पद १ अल्पदृष्टी व १ कर्णबधीर प्रवर्गासाठी राखीव आहे.**

## ३. सहायक

पे-बँड ₹ ५२०० – २०२०० ग्रेड पे – १९००

| जातप्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंशकालीन | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अनु. जाती** | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **अनु. जमाती** | १ | -- | -- | -- | १ | -- | -- | -- |
| **विमुक्त जाती (अ)** | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| **भ ज (ब)** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **भ ज (क)** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **भ ज (ड)** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **विशेष मागास प्रवर्ग** | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| **इतर मागासवर्गीय** | ३ | १ | १ | -- | -- | -- | -- | १ |
| **खुला** | ४ | १ | १ | १ | -- | -- | १ | -- |
| **एकूण** | ११ | ३ | २ | १ | १ | -- | १ | ३ |

**टिप -**

१. समांतर आरक्षण हे शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे राहील. आरक्षणासंदर्भात दर्शविण्यात आलेली पदसंख्या स्वतंत्र नाही. सदर आरक्षण त्या त्या प्रवर्गातील एकूण पदापैकी आहे. समांतर आरक्षणापैकी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील उमेदवारांद्वारे सदरचे पद भरले जाईल.

२. तक्त्यांमध्ये दर्शविण्यात आलेले अपंगांचे पद स्वतंत्र नाही. अपंग उमेदवार ज्या संवर्गातुन प्राप्त होईल त्या संवर्गामधुन ते पद भरले जाईल याची नोंद घ्यावी.

३. सदर पदांमध्ये कमी जास्त बदल होण्याचा संभव आहे व याबद्द्ल उमेदवारांची कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही. हे अधिकार महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांनी राखुन ठेवले आहेत.

४. वि.जा (अ),भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

५. शासनाने भरतीबाबत / नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक, आदेश इत्यादी भरती प्रक्रियेला लागू राहतील.

**६.** शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६ अ दिनाक १६/०३/२००९ अन्वये गुणवत्तेनुसार समांतर आरक्षणातील प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नाही तर समांतरआरक्षणाकरीता **त्या-त्या प्रवर्गातील उमेदवारांना उपलब्धतेनुसार पर्याप्त संख्येत यादीतील शेवटचे उमेदवार वगळून समाविष्ट करण्यात येतील.**

**आवश्यक शैक्षणिक अर्हता :-**

**खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता दिनांक ३१/१२/२०१७ या दिनांकास अथवा त्यापूर्वी प्रमाणपत्रांसहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे.**

| अ.क्र. | संवर्ग(पदनाम) | किमान शैक्षणिक अर्हता /अनुभव |
|---|---|---|
| १ | **कनिष्ठ साठा अधिक्षक** | 1. मान्यताप्राप्त विद्यापीठाची शेतकी किंवा शेतकी व्यवसाय व्यवस्थापन यामधील पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>2. उमेदवार महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत **MS-CIT** परिक्षा किंवा महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस २०१२/प्र.क्र. २७७/३९ दिनांक ०४ फेब्रुवारी २०१३ मध्ये नमुद केलेल्यांपैकी संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| २ | **भांडारपाल** | 1. मान्यताप्राप्त विद्यापीठाची शेतकी किंवा शेतकी व्यवसाय व्यवस्थापन यामधील पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>2. उमेदवार महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत **MS-CIT** परिक्षा किंवा महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस २०१२/प्र.क्र. २७७/३९ दिनांक ०४ फेब्रुवारी २०१३ मध्ये नमुद केलेल्यांपैकी संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| ३ | **सहायक** | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२. उमेदवार महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत **MS-CIT** परिक्षा किंवा महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस २०१२/प्र.क्र. २७७/३९ दिनांक ०४ फेब्रुवारी २०१३ मध्ये नमुद केलेल्यांपैकी संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३. एखादा उमेदवार बी.ई. (आय.टी), बी.ई. (ई अँड टी.सी.), बी.ई. (कॉम्प्यूटर) किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठ / मंडळाची संगणक शास्त्र किंवा आय.टी. पदवी किंवा २ वर्षांची पदविका उत्तीर्ण असेल तर मुद्दा क्र. २ शिथिलक्षम. |

## वयोमर्यादा

वयोमर्यादेकरीता उमेदवाराचे दिनांक ३१/१२/२०१७ रोजीचे वय विचारात घेतले जाईल.

**सर्वसाधारण उमेदवाराचे वय दिनांक ३१/१२/२०१७ रोजी १९ वर्षापेक्षा कमी नसावे व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.**

| अ.क्र. | आरक्षण/ समांतर आरक्षण | शासननियमानुसार आरक्षणांकरिता कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय उमेदवार | ४३ वर्षे |
| २ | नि:समर्थ व्यक्ती (विकलांग) उमेदवार | ४५ वर्षे |
| ३ | प्रकल्पग्रस्त | |
| ४ | भुकंपग्रस्त | |
| ५ | शासकीय कर्मचारी | |
| ६ | सन १९९१ चे जनगणना /सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी | |
| ७ | अपंग माजी सैनिक | |
| ८ | स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचे नाम निर्देशित पाल्य | |
| ९ | पदवीधारक अंशकालीन कर्मचारी | ४६ वर्षे |
| १० | उच्च गुणवत्ताधारक खेळाडु उमेदवार | खुला प्रवर्ग ४३ वर्षे |
| | | मागासवर्गीय ४३ वर्षे |

**#** सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांकः मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दिनांक २० ऑगस्ट, नुसार माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सवलत ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेतला कालावधी अधिक ३ वर्षे इतका राहील.

## अर्ज भरणे व सादर करणेबाबत सूचना :

1. **ऑनलाईन पध्दतीशिवाय अन्य कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.** अर्ज स्विकारणेसाठी विहीत केलेला दिनांक व वेळेनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.
2. उमेदवाराने अर्ज भरण्यापूर्वी www.mswarehousing.com व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी. भरावयाची सर्व माहिती आपल्याकडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतरच आपला अर्ज भरावा. पात्र उमेदवाराला वेब बेस (Web base) ऑनलाईन अर्ज दिनांक ०९-०१-२०१८ ते ३०-०१-२०१८ https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील. इतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.
3. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.
   a. प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे
   b. अर्ज सादरीकरण
   c. शुल्क भरणा

३.a. **प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे**

१. https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वापरकरर्त्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरीता नवीन वापरकर्त्यांची नोंदणीवर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल. नवीन खाते (वापरकर्त्यांचे नाव Login व Password) निर्माण करण्यासाठी लॉग-इन पृष्ठाद्वारे विचारलेली सर्व माहिती भरुन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.

२. प्रोफाईलद्वारे माहिती भरताना उमेदवाराने स्वत:च ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक व जन्मदिनांक नोंदविणे आवश्यक आहे.


३. उमेदवारांकडे नित्य वापरात असेल असा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरती प्रक्रियेदरम्याने पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याकारणामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध / कार्यरत राहणे आवश्यक आहे.

४. वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर वापरकरर्त्याने स्वत:च्या Login व Password द्वारे प्रवेश करुन प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशील, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशीलाची अचूक नोंद करावी.

५. फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे :-
नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलद्वारे विचारलेली माहिती भरुन झाल्यानंतर उमेदवाराने स्वत:चे छायाचित्र / फोटो (रुंदी ३.५ से.मी. X उंची ४.५ से.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी स्कॅन करुन खालीलप्रमाणे अपलोड करावी :-

१) एका पांढ-या स्वच्छ कागदावर विहीत आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकित करुन नये. वरील सुचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करुन नये. फक्त स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल.

२) फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजेचे आहे.
फोटो रुंदी ३.५ सें.मी.




३) छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परिक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणार असावे.

४) विहीत आकार / क्षमतेप्रमाणे काळया शाईच्या पेनने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी.

५) उमेदवाराने स्वत: स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राहय धरण्यात येणार नाही.

६) वरीलप्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.

७) फोटो व स्वाक्षरीची प्रत्येकाची संपूर्ण इमेज स्कॅन करुन jpg फॉर्मेट मध्ये संगणकावर वेगवेगळया फाईल्समध्ये स्वतंत्रपणे जतन (save) करावी. फोटो, तसेच स्वाक्षरी इमेज प्रत्येकी ५० kb पेक्षा जास्त असता कामा नये. यापेक्षा जास्त क्षमतेची इमेज प्रणालीवर स्वीकारली जात नाही. इमेजची साईज ५० kb पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dpi resolution, no.of colours, etc. व्दारे स्कॅनिंगच्या वेळी setting Adjust करावे.

८) स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र / हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्या वेळी, प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

३.b. **अर्ज सादरीकरण** :

१. https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वापरकरर्त्याने स्वत:चे रजिस्ट्रेशन करुन घ्यावे व स्वत:च्या युजर आयडी व पासवर्डद्वारे यशस्वीरित्या प्रवेश (Login) केल्यानंतर प्रोफाईल पूर्णपणे भरुन घ्यावे जाहिरातीद्वारे प्रसिध्द केलेल्या पदाबाबतची यादी या ठिकाणी उपलब्ध होईल.

२. ज्या पदासाठी अर्ज करावयाचा असेल त्या जाहिरातीच्या उजवीकडे असलेल्या “अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा” या ठिकाणी क्लिक करावे.

३. उमेदवाराच्या प्रोफाईलच्या आधारे यंत्रणा वैधता तपासेल. वापरकर्ता जाहिरातीतील निकष पूर्ण करीत असल्यास वापरकरर्त्याला अर्ज सादर करता येईल.

४. जाहिरातीमध्ये नमूद केलेले निकष वापरकर्ता पूर्ण करीत नसल्यास माहिती संग्रहित होऊ शकत नाही असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल. उमेदवाराने त्यानुसार प्रोफाईल पूर्णपणे अद्ययावत करणे आवश्यक आहे.

५. रक्कम भरा या पर्यायावर क्लिक करुन अर्जदाराला क्रेडिट कार्ड/ डेबीट कार्ड/ नेट बँकिंग/ पे-टीएम द्वारे भरणा करता येईल. अथवा अर्जदार ऑनलाईन अर्ज सादर करुन भारतीय स्टेट बँकमध्ये चलनाद्वारे शुल्काचा भरणा करण्याचा पर्याय स्विकारु शकेल.

६. विहीत पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची, तसेच भारतीय स्टेट बँकेत शुल्क भरण्याकरीता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक ०९-०१-२०१८ ते ३०-०१-२०१८ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

७. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक ०९-०१-२०१८ ते ३१-०१-२०१८ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक आहे. विहीत दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही. तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

३.c. **शुल्क भरणा**

यशस्वीरित्या अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता खाली नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा.

१. शुल्क भरण्याकरीता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील "माझे खाते" या लिंक वर क्लिक करावे.
२. उजवीकडे असलेल्या पर्यायांपैकी थेट भरती हा पर्याय निवडून उमेदवाराने महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ या ग्राहकाचे नाव निवडावे.
३. ग्राहक निवडल्यावर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्यास / न भरल्यास नोंदीसह दिसेल, ज्या पदासमोर Unpaid असे लिहीलेले असेल, त्या ठिकाणी Pay Now अशी लिंक उपलब्ध असेल.
४. "माझे खाते" या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर "Unpaid" असे लिहीलेले असेल, त्या ठिकाणी "Pay Now" अशी लिंक उपलब्ध असेल.
५. "Pay Now" या लिंकवर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंट, (ब) नागरी सुविधा केंद्र, (क) चलनाद्वारे.
६. क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड, अथवा नेट बँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करता येईल.
७. नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.
८. ज्या उमेदवारांना इंटरनेटद्वारे स्वत: अर्ज भरावयाचा नसेल, असे उमेदवार महा-ई-सेवा केंद्रामार्फत आपला अर्ज करु शकतात. त्याचवेळी उमेदवाराकडून परीक्षा शुल्क व सेवा केंद्राचे शुल्क घेतले जाईल. उमेदवारांना पैसे भरण्याची पावती महा-ई-सेवा केंद्रातर्फे देण्यात येईल. या सुविधेमध्ये आवेदन अर्ज भरणे व पैसे भरल्यानंतर पैसे भरल्याची पावती देणे याचा समावेश असेल. फोटो/ स्वाक्षरी स्कॅन किंवा अर्जाच्या प्रिंट करीता स्वतंत्र रक्कम केंद्र चालकाकडून आकारली जाईल.
९. चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.
१०. भारतीय स्टेट बँकमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.
११. चलनाद्वारे शुल्क स्विकारणेकरीता भारतीय स्टेट बँक उमेदवाराकडून परीक्षा शुल्क व्यतिरिक्त नियमानुसार सेवा शुल्क आकारेल. अशा प्रकारे उमेदवारास चलनाद्वारे शुल्क भरताना परिक्षा शुल्क + बँकेचे सेवा शुल्क भरावे लागेल.
१२. विहीत दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही. तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

## ४. सर्वसाधारण सूचना

१. प्राप्त अर्जाच्या संख्येचा विचार करुन निवड प्रक्रियेचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार निवड समितीला राहील.

२. नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वत:च करणे आवश्यक आहे.

३. अर्ज मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आला असला, तरी संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. अर्जातील संपूर्ण माहिती CAPITAL LETTERS मध्ये भरावी. संक्षिप्तपणे (Abbrevations) वा आद्याक्षरे (Initials) न देता संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या / पत्त्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.

४. महिला उमेदवारांनी (विवाहीत असल्यास)पूर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.

५. एस.एस.सी अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदलासंदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

६. पत्रव्यवहाराचा स्वत:चा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा. व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र/ वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा/ संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देवू नये.

७. अर्जामध्ये केलेला दावा व कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर केलेल्या सारांशपत्रातील अथवा सादर केलेल्या कागदपत्रातील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती अधिकृत समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्याने / मिळाल्याने उमेदवारी रद्द होवू शकते.

८. संबंधित पदाच्या / परीक्षेच्या जाहिरात/ अधिसूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता अजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल.

९. वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे याशिवाय दुस-या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील.

१०. उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ जबाबदार राहणार नाही.

११. उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी त्याच्या प्रवेशप्रत्रावर / उपस्थितीपत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरीलप्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

१२. पूर्णत: माहिती भरलेल्या अर्जाची प्रिंट आऊट काढून घ्यावी. प्रिंट काढलेल्या अर्जाची प्रत जपून ठेवावी. अर्जाची प्रिंट परीक्षेच्या वेळी तसेच कागदपत्रे तपासणीचे वेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

१३. भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्याअनुषंगाने होणा-या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ www.mswarehousing.com व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. या व्यतीरिक्त कोणत्याही माध्यमाद्वारे भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१४. विहीत दिनांकानंतर व विहीत वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्वीकृत केला जाणार नाही.

१५. ऑनलाईन प्रक्रियेबाबत कोणतीही तक्रार असल्यास ०२२- ६१३१६४०३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. किंवा अर्ज भरण्यासंबंधी, प्रवेशपत्र उपलब्ध होणेसाठी उमेदवारांनी mr.support@mahaonline.gov.in यावर ई-मेल पाठविल्यानंतर उमेदवारांना त्यांच्या अडचणीचे निराकरण करुन उमेदवारांच्या भ्रमणध्वनीवर संदेश किंवा ई-मेल आयडीवर पाठविण्यात येईल. उमेदवारांनी अर्जामध्ये त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल इत्यादी अचूकपणे भरणे अनिवार्य आहे.

१६. उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन परीक्षेचा अंतिम निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा / अपूर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील, तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे जबाबदार नाही. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याबाबतचा संदेश ई-मेल/ एस.एम.एस. द्वारे कळविण्यात येईल. उमेदवाराने आपल्या ई-मेल आयडीची कोणत्याही परिस्थितीत इतर व्यक्तींसोबत देवाण-घेवाण करु नये. एखादया उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वत:चा ई-मेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.

## परिक्षेचे स्वरुप

| अ.क्र | पदनाम / संवर्ग | ऑनलाईन परिक्षा एकूण गुण |
|---|---|---|
| १ | कनिष्ठ साठा अधिक्षक / भांडारपाल | २०० |
| २ | सहाय्यक | २०० |

## ऑनलाईन परिक्षा व प्रश्नपत्रिकेचे स्वरुप सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे राहील.

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-१२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३-अ, दिनांक ०५/०६/२०१४ मधील तरतुदीनुसार वरील पदांकरीता मुलाखत घेण्यात येणार नसल्याने ऑनलाईन परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड केली जाईल.

२. ऑनलाईन परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील.

३. वरील पदांकरीता ऑनलाईन परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता (कृषी फलोत्पादन, साठवणूक गोदाम व्यवस्थापन केंद्र व राज्य शासनाची ध्येय धोरणे, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील घडामोडी इ. विषयक प्रश्नांचा समावेश असेल) २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी ऑनलाईन परीक्षा घेतली जाईल.

४. गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकुण गुणांच्या किमान ५० टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

५. उमेदवारांची मुलाखत घेण्यात येणार नसल्याने ऑनलाईन परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

६. जाहिरातीत नमूद पदांकरीता अर्ज केलेल्या ऑनलाईन परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे ऑनलाईन परीक्षेचे प्रवेशपत्र www.mswarehousing.com व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन परीक्षेच्या किमान ८ (आठ) दिवस अगोदर त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येतील. (अपलोड करण्यात येतील) उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षा प्रवेशपत्र स्वत: संकेतस्थळावरुन काढून घ्यावे. कोणत्याही उमेदवारास पोस्टाने प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७. उमेदवारांस एकापेक्षा जास्त पदाकरीता अर्ज करावयाचा असल्यास कनिष्ठ साठा अधिक्षक / भांडारपाल या पदांसाठी एक अर्ज व सहाय्यक या पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा. तसेच प्रत्येक अर्जासाठी परीक्षा शुल्क स्वतंत्रपणे भरावे.

८. उमेदवारांची एकापेक्षा जास्त पदाकरीता निवड झाल्यास त्याची कोणत्या पदावर नेमणूक करावयाची याचा अधिकार महामंडळाकडे राहील.

९. कनिष्ठ साठा अधिक्षक / भांडारपाल या पदांसाठी पात्र झालेल्या उमेदवारांच्या यादीतून गुणवत्तेनुसार प्रथम कनिष्ठ साठा अधिक्षक या पदावर आरक्षणनिहाय नियुक्ती देणेसाठी विचार करण्यात येईल व त्यानंतर भांडारपाल या पदावर आरक्षणनिहाय नेमणूक देणेसाठी विचार करणेत येईल. या पदांसाठीचे सामाजिक आरक्षण लक्षात घेता भज (ब) व भज (ड) या प्रवर्गासाठी फक्त भांडारपाल या पदांमध्ये जागा उपलब्ध आहेत. त्यामुळे त्यांचा विचार भांडारपाल या एकाच पदासाठी करण्यात येईल.

१०. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्र आणणे बंधनकारक आहे, त्याशिवाय कोणत्याही उमेदवारांस परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेशपत्र स्वत:जवळ जपून ठेवावे.

११. अपंग कल्याण आयुक्तालय यांचे दि. २० डिसेंबर २००६ चे परिपत्रकानुसार तसेच शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क्र.२, दिनांक १८/३/१४ अन्वये शासनाने जारी केलेल्या आदेशानुसार दृष्टीहीन, अल्पदृष्टी, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित उमेदवार लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास परीक्षा प्रयोजनार्थ त्यांच्या मागणीप्रमाणे लेखनिक व अन्य बाबी संदर्भात सहायक व्यवस्था उमेदवारास स्वत: करावी लागेल. त्यासाठी उमेदवाराने १५ दिवस अगोदर https://maharecruitment.mahaonline.gov.in यांचेकडे अपंगत्वाच्या प्रमाणपत्रासह सुस्पष्ट ऑनलाईन मागणी करणे आवश्यक आहे, अशी सहायकाची मागणी न केल्यास ऐनवेळी सहायकाची मदत घेता येणार नाही व त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार चालणार नाही.

१२. ज्या उमेदवारांना परीक्षेच्या दिवशी सहायकाची मदत पुरविण्यात आली आहे, अशा उमेदवारांना व सर्व अल्पदृष्टी उमेदवारांना पेपर सोडविण्यासाठी प्रत्येक तासाला २० मिनिटे अतिरिक्त वेळ दिला जाईल. तथापि अशा उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेच्या वेळी अपंगत्वाचे प्रमाणे किमान ४०% असल्याबाबतचे मूळ प्रमाणपत्र व त्याची साक्षांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

१३. काही अपरिहार्य कारणास्तव ऑनलाईन परीक्षेच्या तारखांमध्ये / परीक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती www.mswarehousing.com व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत ऑनलाईनस्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१४. **ओळख पटवणे** -

a. परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे मूळ कागदपत्रासह व उमेदवाराचा अलीकडील फोटो चिकटवलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card)/ पारपत्र (Passport)/ वाहनचालक परवाना (Driving License)/ मतदार ओळखपत्र (Voter ID)/ आधार कार्ड/ फोटोसहीतचे पासबुक/ कर्मचारी ओळखपत्र/ फोटोसहीत असणारे बार कौन्सिलचे ओळखपत्र समवेक्षक/ पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराची ओळख उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक/ उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटविण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.

   **टिप** :- उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मूळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणा-या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या / मधल्या/ शेवटच्या नावात विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र/ विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Affidavit) यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

b. परीक्षेला उशिरा येण्याबाबत:- परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणा-या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रातील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी दोन तास असली तरी उमेदवारास ओळख पटवणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, परीक्षेसाठी लॉग इन करणे, सूचना देणे या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी **साधारण एक तास आधी परीक्षा स्थळावर उपस्थित रहावे लागेल.**

   निवड प्रक्रिये दरम्याने गैरवर्तणूक/ अनुचित प्रकार/ गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारांवर करावयाची कार्यवाही :-

   उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती/ तपशील देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करुन सादर करु नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये. अनुचित प्रकार करणे, तोतयेगिरी करणे,परिक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणुक करणे इ. कृत्यामध्ये उमेदवार दोषी आढळल्यास त्या उमेदवाराला अपात्र ठरविले जाईल.

## पदांच्या निवडीसाठी कार्यपद्धती, अटी, शर्ती.

१. ऑनलाईन परीक्षेअंती उमेदवारांचे प्राप्त गुण, जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्र पडताळणी करण्याकरिता अंतरिम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, मूळ कागदपत्रांच्या आधारे परिपूर्ण सिद्ध होईल अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्या करीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपुर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मूळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास व आवश्यक कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरल्यास उमेदवारांची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा अशा उमेदवारांचे मागी तलेले सामाजिक आणि/किंवा समांतर आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथिलीकरण, परिक्षा शुल्क इ. सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील व अपात्र ठरविणेत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

२. अंतिम निवड - शासन निर्णय सा.प्र. विभाग, प्रानिमं-१२१५/(प्र.क्र.५५/१५)/१३-अ, दिनांक ०५/१०/२०१५ अन्वये,

अ) उमेदवारांची अंतिम निवड हि ऑनलाईन परिक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल.

ब) परीक्षेचा निकाल तयार करताना परीक्षेत ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल :-

१) वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

२) समान वय असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे) धारण करणा-या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

३) वरील अनु. क्र. १ व २ या दोन्ही अटींमध्ये समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतम गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

३. उक्त कनिष्ठ साठा अधीक्षक, भांडारपाल व सहायक या सवंर्गातील पदे पदोन्नतीने, सेवानिवृत्तीने, स्वेच्छानिवृत्तीने, राजीनामा तसेच मयत झालेने रिक्त झालेली आहेत. सदरची पदे भरणेसाठीची निवड यादी व प्रतिक्षा यादी १ वर्षे मुदतीसाठी किंवा पुढील सेवा भरतीची जाहिरात देणेत येईल, त्या दिनांकापर्यंत या पैकी जो आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य ठरेल तद्नंतर ही निवड व प्रतिक्षा सुची व्यपगत येईल.

## <u>इतर सर्वसाधारण अटी/ शर्ती/ सूचना :-</u>

१. विभागीय व भाषा परीक्षा :- विहित शासकीय नियमांनुसार विभागीय परीक्षा भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

२. **(i)** शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१० दि. २७ जून २०११ नुसार ज्या परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.
**(ii)** सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परिक्षार्थीकडे आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याचा दाखल्यामध्ये त्या परिक्षार्थींचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांतदेखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

**(iii)** उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थींसाठी लागू राहतील. इतर परिक्षार्थी / उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

३. सेवाप्रवेश नियमांनुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

४. निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून शासकीय सेवा करण्याकरीता शारिरीक क्षमतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र नियुक्ती आदेशानंतर रुजू झाल्याच्या दिनांकापासून ०२ महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

५. नियुक्तीपूर्वी मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला आवश्यकता असल्यास अद्ययावत नॉनक्रिमीलेअर दाखला, जातीचा दाखला तसेच आवश्यक ती मूळ कागदपत्रे इत्यादीची छाननी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांच्या स्तरावर केली जाईल. त्यामुळे अशी अद्यावत प्रमाणपत्रे अर्ज दिनांकास उमेदवारांकडे असावीत याची खबरदारी घेणेची आहे. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाही. छाननीअंती वरील प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास/ माहिती खोटी आढळल्यास अथवा प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास नियुक्ती दिली जाणार नाही/ नियुक्ती रद्द होईल.

६. उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेची प्रवेशपत्रे, परीक्षेचे वेळापत्रक, बैठकव्यवस्था, कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र उमेदवारांची यादी, निवेदने, तात्पुरती निवड व अतिरिक्त सूची, अंतिम निवड व अतिरिक्त सूची व इतर सर्व सूचना हया वेळोवेळी www.mswarehousing.com व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. त्याबाबत उमेदवारांना ऑनलाईनपत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

७. शासन निर्णय क्र. चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ दिनांक २८/०८/२०१७ नुसार उमेदवारांनी निवड झाल्यानंतर स्वयं साक्षांकित नमुना सादर करणे आवश्यक आहे. तसेच पोलिस ठाण्याकडून चारित्र्य व पूर्वचारित्र्य अहवाल ०६ महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

८. उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत.

९. उमेदवाराने या भरती प्रक्रियेसंदर्भातील माहिती व सूचना महामंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कृपया www.mswarehousing.com व https://maharecruitment.mahaonline.gov.in वरील वेबसाईट उमेदवारांनी वेळोवेळी पहावी.

१०. महामंडळाने वेळोवेळी घेतलेले निर्णय संबंधितांवर बंधनकारक असतील.

११. उमेदवाराची ऑनलाईन परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. ऑनलाईन परिक्षेच्या प्राथमिक चाळणी नुसार गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचे जवळ राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

१२. संकेतस्थळावर, ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतरच्या पुढील कार्यालयीन दिवशी खालील पद्धतीने प्रकिया शुल्क भरता येईल. संकेतस्थळावरुन प्राप्त होणा-या चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फत चलनात नमूद असलेली आवश्यक ते प्रक्रिया शुल्क स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरता येईल. सदरच्या ०२ प्रतींपैकी उमेदवारास त्याची स्वत:ची प्रत, स्टेट बँक ऑफ इंडिया कडून परत मिळेल. त्यापैकी उमेदवारांनी कागदपत्र छाननीचे वेळी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचे कडे जमा करावी. सदर चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी घेतली जाणार नाही.

बँकेत प्रक्रिया शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक **०९-०१-२०१८** ते दि. **३१-०१-२०१८** पर्यंत आहे.

प्रक्रिया शुल्क भरण्याच्या अंतिम दिनांका नंतर प्रक्रिया शुल्क भरणा-या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१३. ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/ समाजकल्याण आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नावे नोंदविलेली आहेत अशा उमेदवारांना वरील भरतीच्या पदासाठीच्या ऑनलाईन परिक्षेसाठी स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन अशा उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत वेबसाईटवर स्वतंत्रपणे ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

१४. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि. १ जुलै २०१६ मधील तरतुदीनुसार प्राविण्यप्राप्त खेळाडू या समांतर आरक्षणाची मागणी केलेल्या उमेदवारांपैकी ऑनलाईन परीक्षेअंती जे उमेदवार कागदपत्र पडताळणीस पात्र ठरतील अशा उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीच्या वेळी मा. विभागीय उपसंचालक क्रिडा व युवकसेवा यांचेकडून क्रिडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो या बाबत प्रमाणित केलेले विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१५. सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक पअंक-१०१०/७१७/प्र.क्र.३२२/१०/१६ अ दिनांक २६ ऑगस्ट २०१० पत्रान्वयें एकदा नोकरी मिळाल्यानंतर पुन्हा दुस-या पदावर नोकरी मिळविण्यासाठी त्यास समांतर आरक्षणाचा लाभ देणे हे शासन धोरणाशी विसंगत आहे. एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदवारांस पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ देता येणार नाही.

१६. अंशकालीन उमेदवारांनी, त्यांनी सुशिक्षीत बेरोजगार अर्थसहाय्य या योजने अंतर्गत तीन वर्षे दरमहा मानधनावर अंशकालीन काम केलेल्या पदवीधर / पदविकाधारक उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे व तशी नोंद ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१७. अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालीक, अंशकालीक, विदयावेतन, अंशदानात्मक, विनावेतन, तत्वावर केलेला अंशकालीक सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्याभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही.

१८. माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावे लागेल.

१९. माजी सैनिकांबाबत Government of India, Ministry of Personnel P.G. & Pensions (Department of Personeel & Training) No. ३६०३४/५/८५-Estt (SCT), New Delhi dt. २७th Oct. १९८६ च्या राजपत्रात सैनिक दलात कार्यरत असतांना १ वर्षाअगोदर माजी सैनिक या पदासाठी अर्ज करता येईल. तसेच तो गुणवत्तेनुसार पात्र ठरल्यास नियुक्तीचे अधिकार हे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील. तसेच माजी सैनिक संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय उमेदवारांवर बंधनकारक राहतील.

२०. भूकंपग्रस्त /प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी शासन नोकरी मिळणेबाबत सक्षम अधिकारी यांचे विहीत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२१. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्तजाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियमक्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगतगटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), आणि भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे **दिनांक ३१/०३/२०१८ पर्यंत वैध असलेले अद्ययावत (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.**

२२. महिलांसाठीचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ हवा असेल त्यांनी तशी मागणी ऑनलाईन अर्जात करणे अनिवार्य आहे. शासन निर्णय महिला व बालकल्याण क्र. ८२/२००१/म.से.आ-२०००/प्र.क्र.४१५/का.२, दि.२५/०५/२००१ मधील तरतूदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहिल. या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणा अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी (अजा व अज वगळून) वर्ष २०१७-१८ या कालावधी करिता वैध असलेले (अद्ययावत अर्थात ३१/०३/२०१८ पर्यत वैध असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

२३. राखीव प्रवर्गातील महिला उमेदवारास जर सर्वसाधारण प्रवर्गातून स्पर्धा करावयाची असेल तर अशा महिला उमेदवारांनी अर्जात तसे नमूद करणे आवश्यक आहे. अशा महिलांनी सर्वसाधारण प्रवर्गातून अर्ज करावा. त्यांना सर्वसाधारण प्रवर्गाचे निकष लागू होतील.

२४. विहित वयोमर्यादेतील शासकीय / निमशासकीय सेवेतील कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरावे व अशा परवानगीची प्रत उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे व ती कागदपत्रे छाननीवेळी सादर करावी.

२५. सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, २८ मार्च २००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, ०१ जुलै २००५ नुसार विहित केलेल्या नुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये शासनाने गट ‘क’ मधील सेवा प्रवेशासाठी रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्याचे संख्याबाबत लहान कुटुंब असल्याच विहीत प्रतिज्ञापन नमुना(अ) आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन बंधनकारक आहे.

२६. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे ऑनलाईन परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच, नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

२७. आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) निवड अंती सादर करणे आवश्यक आहे.

२८. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी-२०११/ प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दि. १२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार, याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. २५/०८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून, **तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ०६ महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.**

२९. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी / नियुक्ती रद्द करण्यांत येईल व शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

३०. भरती प्रक्रियेतील सर्व अधिकार मा. अध्यक्ष व व्यस्थापकीय संचालक यांना असून कोणत्याही टप्पयावर भरती स्थगित करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक , पुणे यांनी राखून ठेवले आहेत.

३१. अपात्र अर्जदारांस स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.

३२. परीक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

३३. वरील अटी, शर्ती, नियमांव्यतिरीक्त शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.

३४. परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर मागासवर्गीयासाठी विहित केलेली वयोमर्यादा, शुल्क तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषांसंदर्भात कोणतीही सूट/सवलत घेतली असल्यास, अशा मागासवर्गीय उमेदवारांची अमागास (सर्वसाधारण) पदावर शिफरस करण्यात येणार नाही.

३५. अमागास उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा, शुल्क तसेच इतर पात्रता विषयक निकषांसदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा अमागास सर्वसाधारण पदावरील शिफारशींकरीता विचार होत असल्याने सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसेल तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ आरक्षित प्रवर्गासंदर्भातील सत्य माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

**परीक्षा शुल्क:-**

खालीलप्रमाणे शुल्क भरावे लागेल.

खुला प्रवर्ग – ₹ ८००/-  मागास प्रवर्ग – ₹ ५००/-

**टिप:** – चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या शाखेत प्रक्रिया शुल्क भरल्यास ₹. ६०/- इतके सेवा शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

**रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे**

| **अ.क्र** | **भरती प्रकिया कार्यक्रम** | **दिनांक** |
|---|---|---|
| १ | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | दिनांक ०९-०१-२०१८ ते दिनांक ३०-०१-२०१८ |
| २ | प्रक्रिया शुल्क चलन जमा करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०९-०१-२०१८ ते दिनांक ३१-०१-२०१८ |

**विशेष सूचना :-**

- सदर परीक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करायाची आवश्यकता नाही, तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करू नयेत.
- अर्जदारांना ऑनलाईन भरण्या संदर्भात काही अडचणी असल्यास त्यासाठी ०२२-६१३१६४०३ या भ्रमणध्वनीवर कार्यालयीन वेळेत किंवा mr.support@mahaonline.gov.in वर संपर्क साधावा.

दिनांक :- ०९-०१-२०१८
स्थळ :- पुणे

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ**